**नि.क्र.२३ वरील आदेशानुसार साक्षीदाराचा उलटतपास पुन्हा शपथवेर सुरू.**

नि.फौ.ख.क्र.९८/२०२३
शासन विरुध्द सचिन यादव
नि.क्र.२२ पुढे सुरु.

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.7 ३ ची उलटतपासणी शपथेवर सुरु.**

**आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. एस.आर.गाढवे**

५. दि.०७ जानेवारी २०२३ रोजी मी माझया सासुला घेवुन भुईंज येथे प्राथमिक आरोग्य केंद्रात गेले होते. हे म्हणणे खरे आहे की त्या आरोग्य केंद्राच्या शेजारीच भुईंज पोलीस स्टेशन आहे. हे म्हणणे खरे नाही की त्या दिवशी कथीत तक्रार नोंदवायला मला कोणतीही अडचण नव्हती. साक्षीदार स्वतहुन सांगते की उशीर झाला होता आणि माझया सासुबाईंवर लागलीच उपचार करणे गरजेचे होते, त्यानुसार पोलीसांच्या सांगण्याप्रमाणे आम्ही आरोग्य केंद्रात गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की दि.०७.०१.२०२३ रोजी कोणतीही मारहाणीची घटना घडली नव्हती व त्यामुळे त्या दिवशी फिर्याद दिली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की त्या दिवशी आमच्या घरी कुणीही नातेवाईक आले नव्हते. आमच्या पट्टी नावाच्या शिवाराला दगडी ताल आहे. हे म्हणणे खरे नाही की त्या दगडी तालीवरून माझी सासु पाय घसरून पडली व त्या घटनेचा गैरफायदा घेवुन खोटी फिर्याद दिली. हे म्हणणे खरे नाही की आरोपी हा माझया सासु सास–यांच्या सांगण्याप्रमाणे वागत नाही. साक्षीदार सांगते की तसा कोणताही प्रश्नच येत नाही. हे म्हणणे खरे आहे की माझे सासु सासरे आरोपीच पाणी दुस–यास विकु नको असे सांगतात आणि त्याप्रमाणे तो वागत नाही. हे म्हणणे खरे नाही की त्यामुळे आम्हा सर्वांनी मिळुन त्यांच्या विरूध्द पोलीस केस करण्याचे ठरविले. हे म्हणणे खरे नाही की दि.०७.०१.२०२३ रोजी माझया सासुला झालेल्या कथीत मारहाणीची कथीत घटना घडलीच नव्हती. हे म्हणणे खरे नाही की मी त्या बाबत माझया सरतपासात सांगितलेला मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की आम्ही

आरोपींविरूध्द विहीरीच्या पाण्याच्या कारणावरून खोटी केस दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की त्या कारणावरून मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

***उलटतपास पुर्ण***

***फेरतपास काहीही नाही.***

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत,

*स्वाक्षरी/-*

दि.१५.११.२०२४

(आर.एम. भेंडे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,